D?
२६/७/२४
३:३०

# उल्हासनगर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : २६/०७/२०२४

## प्रेसनोट

"सफाई अपनाओ, बिमारी भगाओ" या अभियांना अंतर्गत डंपिंग ग्राउंड परिसरात मान्सून मध्ये होणाऱ्या आजाराला आळा घालण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिके मार्फत मा. आयुक्त डॉ. अझीझ शेख यांच्या आदेशानुसार शंकर मंदिर पाण्याच्या टाकीजवळ खडी मशीन गायकवाडपाडा कॅम्प नं.०५ येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यांचे निर्देश दिले होते.

यानुषंगाने मा. श्री. जमीर लेंगरेकर, श्री.किशोर गवस अतिरिक्त आयुक्त व उप आयुक्त डॉ. जाधव, श्री. मनीष हिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्य स्वच्छता निरीक्षक श्री. एकनाथ पवार, श्री.विनोद केणे यांच्या नेतृत्वात वैद्यकीय विभागाच्या डॉ. जोशना मोरे यांनी त्याच्या स्टाफसह आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले.

सदर अभियानात डम्पिंग ग्राउंड परिसरातील महात्मा फुले नगर, बंजारा कॉलनी, विठ्ठल कॉलनी, जोशना कॉलनी, शनेश्वर आदी कॉलनीतील नागरिकांनी आरोग्य तपासण्या करून घेतल्या. या मोहिमेत जळपास ६० पेक्षा जास्त महिला व पुरुषांनी तपासण्या करून शिबिराचा लाभ घेतला.

सा. नियंत्रक श्री.दिपक भोये, डम्पिंग इन्चार्ज श्री. राजू निकाळजे यांनी परिश्रम घेऊन शिबीर यशस्वी पार पाडले. यावेळी माजी नगरसेवक मा.श्री. किशोर वनवारी, जेस्ठ नागरिक श्री. सुरेश गायकवाड, श्री. दिपक गायकवाड व परिसरातील अनेक नागरिकानी सहभाग नोंदवला. तसेच जवळपास ७०-८० कर्मचाऱ्यांद्वारे डम्पिंग ग्राउंड परिसरात स्वच्छता मोहीम राबवून १० स्प्रे पंप व फॉग मशीनद्वारे परिसरात जंतूनाशक फवाराणी करण्यात आली.

मा. आयुक्त डॉ. अझीझ शेख यांच्या हस्ते नुकतेच दुर्गापाडा येथे नवीन हेल्थ पोस्टचे उदघाट्न करून परिसरातील नागरिकांसाठी मुक्त आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिली आहेत. याचा लाभ घेण्याचे आवाहन श्री. पवार यांनी तेथील स्थानिक नागरिकांना केले.

२६/७/२४

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.